## आजचे पंचांग

गुरुवार दि. १२ मार्च २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२७, शालिवाहन शक १९४७, विक्रम संवत २०८२, विश्वावसुनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, फाल्गुन मास, कृष्णपक्ष, नवमी रात्री (पहाटे पर्यंत) ६-३० पर्यंत
दिवस नक्षत्र– मूळ रात्री १२-४४ पर्यंत
योग– सिद्धि सकाळी ९-५९ पर्यंत नंतर व्यतिपात
चंद्र रास- धनु, सूर्य रास = कुंभ, गुरु रास= मिथुन

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

## मित्राची भररस्त्यात हत्या

**पुणे**: शहरात किरकोळ वादातून एका तरुणाची निर्घृण हत्या झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. कॅम्प परिसरात मित्रांमध्ये झालेल्या वादातून ही घटना घडली असून मारहाणीचा सीसीटीव्ही व्हिडिओही सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या प्रकरणी पोलिसांनी आतापर्यंत चार जणांना अटक केली असून इतर आरोपींचा शोध सुरू आहे. फैसल फारुख खान असे मृत तरुणाचे नाव आहे.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 — गुरुवार , दि. १२ मार्च, २०२६ — वर्ष - १ अंक - १६६ पाने - ४ — पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### कार्ती चिदंबरम यांच्या कार्यालयावर हल्ला

**शिवगंगा (तामिळनाडू)** : कराईकुडी येथील काँग्रेस खासदार कार्ती चिदंबरम यांच्या कार्यालयात अज्ञात पुरूषांनी रॉकेलने भरलेल्या बाटल्या फेकल्या आणि या घटनेत कोणीही जखमी झाले नाही, असे पोलिसांनी सांगितले. माजी केंद्रीय गृहमंत्री पी. चिदंबरम यांचे पुत्र कार्ती यांच्या कार्यालयावर मोलोटोव्ह कॉकटेल हल्ल्यानंतर सखोल चौकशी सुरू करण्यात आली आहे. सुब्रमण्यपुरम येथे असलेले हे कार्यालय खासदार कार्ती आणि त्यांचे वडील या दोघांकडून वापरले जाते.

### कर्नाटक डेटा सेंटर धोरण राबवणार

**बेंगळुरू** : कर्नाटक आयटी/बीटी मंत्री प्रियांक खरगे यांनी बुधवारी सांगितले की, राज्य सरकार त्यांच्या पाणी आणि ऊर्जेच्या वापराशी संबंधित महत्त्वपूर्ण पर्यावरणीय खर्चाच्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर "शाश्वत डेटा सेंटर धोरण" विचारात घेत आहे. विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान दोड्डाबल्लापूरचे भाजप आमदार धीरज मुनिराज यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले, आमच्याकडे ३२ खाजगी डेटा सेंटर कार्यरत आहेत. त्यांना (आमदार) सरकारकडून डेटा सेंटर हवे आहेत.

### मगरीच्या हल्ल्यात मच्छीमाराचा मृत्यू

**केंद्रपारा (ओडिशा)** : ओडिशाच्या केंद्रपारा जिल्ह्यातील भितरकणिका राष्ट्रीय उद्यानाच्या सीमेवरील एका गावात खाऱ्या पाण्यातील मगरीच्या हल्ल्यात एका ४८ वर्षीय मच्छीमाराचा मृत्यू झाला, असे एका वन अधिकाऱ्यांनी बुधवारी सांगितले. वन आणि अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी नंतर नदीतून अपंग मृतदेह बाहेर काढला. महाकालपाडा वनक्षेत्रातील बौलाकणी गावात ही घटना घडली. मंगळवारी दुपारी मासेमारीसाठी जाळे टाकत असताना देबा कुमार मंडल नावाच्या मच्छीमाराला मगरीने पाण्यात ओढले.

## विधानसभा अध्यक्ष नार्वेकर यांचा कडक इशारा

# अनुपस्थित अधिकाऱ्यांवर कारवाईचा बडगा!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : विधानसभेतील अर्थसंकल्पावरील चर्चेदरम्यान वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला. सभागृहातील अधिकाऱ्यांसाठी राखीव असलेली 'अदृश्य गॅलरी' जवळपास रिकामी असल्याचे निदर्शनास आल्यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी प्रशासनाला कडक इशारा दिला. महत्त्वाच्या चर्चेदरम्यान वरिष्ठ अधिकारी उपस्थित नसल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा अधिकार विधानसभेला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अर्थसंकल्पावरील चर्चेदरम्यान सभागृहात केवळ चार मंत्री उपस्थित असल्याचेही सदस्यांच्या निदर्शनास आले. त्याच वेळी अधिकाऱ्यांच्या गॅलरीत वरिष्ठ अधिकारी मोठ्या प्रमाणात अनुपस्थित असल्याने अनेक सदस्यांनी नाराजी व्यक्त केली. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ आमदार दिलीप वळसे-पाटील यांनी हा मुद्दा उपस्थित करत प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

वळसे-पाटील म्हणाले की, अर्थसंकल्प हा सभागृहातील सर्वात महत्त्वाचा विषय असतो. या चर्चेदरम्यान राज्याचे मुख्य सचिव, वित्त सचिव आणि नियोजन सचिव यांसारख्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांच्या लॉबीत उपस्थित राहून सदस्यांनी मांडलेल्या मुद्द्यांची, भावना आणि सूचनांची नोंद घेणे अपेक्षित असते. सभागृहात मांडल्या जाणाऱ्या सूचनांवर प्रशासनाने गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. विभागनिहाय चर्चेदरम्यान संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित असतील, तर सदस्यांच्या प्रश्नांना त्वरित प्रतिसाद देणे शक्य होते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या मुद्द्यावर प्रतिक्रिया देताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगितले की, सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा अत्यंत योग्य आहे. ही गॅलरी 'अदृश्य' असली तरी वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांची उपस्थिती बंधनकारक आहे. यासंदर्भात प्रशासनाला यापूर्वी पत्रव्यवहार करून सूचना देण्यात आल्या आहेत. तरीही अशा महत्त्वाच्या चर्चेदरम्यान अधिकारी अनुपस्थित राहणे योग्य नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

नार्वेकर पुढे म्हणाले की, प्रशासनासाठी ही शेवटची संधी आहे. भविष्यात अशा महत्त्वाच्या चर्चेदरम्यान अतिरिक्त मुख्य सचिव स्तरावरील अधिकारी गॅलरीत उपस्थित नसतील, तर सभागृह त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा विचार करू शकते. विधानसभेच्या कामकाजाचा आदर राखणे आणि सदस्यांनी मांडलेल्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे, असेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी या प्रकरणात केवळ इशारे देऊन चालणार नाही, तर प्रत्यक्ष कारवाई करून सभागृहाचे अधिकार दाखवून देण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीच्या मुद्द्यावर सभागृहात काही काळ चर्चा रंगली. या घटनेमुळे प्रशासनाने विधिमंडळातील कामकाजाला अधिक गांभीर्याने घेण्याची गरज असल्याची भावना अनेक सदस्यांनी व्यक्त केली.

## विधानभवन परिसरात आत्मदहनाचा प्रयत्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : अधिवेशन काळात राज्याच्या विविध भागांतून नागरिक आपल्या समस्या आणि तक्रारी घेऊन मंत्रालय तसेच विधानभवन परिसरात येत असतात. मात्र अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यास काही जण आक्रमक पवित्रा घेत संताप व्यक्त करत असल्याचे प्रकार समोर येत आहेत. अशाच एका घटनेत सोलापूर जिल्ह्यातील व्यक्तीने विधानभवन परिसरात अंगावर केरोसीन ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी हस्तक्षेप केल्यामुळे अनर्थ टळला.

ही घटना विधानभवन परिसरातील उषा मेहता चौकात घडली. दादासो बाबन कळसाईत (वय ३८, रा. टाकळी, ता. माढा, जि. सोलापूर) असे आत्मदहनाचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीचे नाव आहे. अंगावर केरोसीन ओतून त्याने आत्मदहनाचा प्रयत्न करताच तेथील पोलिसांनी तत्काळ धाव घेत त्याला ताब्यात घेतले. या घटनेमुळे काही काळ परिसरात खळबळ उडाली. संवेदनशील आणि सायलेंट झोन असलेल्या विधानभवन परिसरात अशा घटना घडत असल्याने सुरक्षा व्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

संबंधिताला पुढील चौकशीसाठी मरीन ड्राईव्ह पोलिस ठाण्यात नेण्यात आले आहे. काही दिवसांपूर्वी त्याच्या गावातील नगरपंचायतीने लोहार समाजाच्या जागेवर उभारलेला भगवान विश्वकर्मा यांचा पुतळा हटविल्यामुळे तो नाराज असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. भारतीय न्याय संहिता कलम २२६ अंतर्गत अदखलपात्र गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगण्यात आले.

## दूध संकलन उद्योगांना दिलासा; वीजदरात मोठी कपात – मुख्यमंत्री

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्यातील दूध संकलन उद्योगांना मोठा दिलासा देणारा निर्णय राज्य सरकारने घेतला असून वीजदरात मोठी कपात करण्यात आली आहे. राज्य वीज नियामक आयोगाने सरकारची मागणी मान्य केली असून येत्या १ जुलै २०२६ पासून नवे वीजदर लागू होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे आमदार अनिल पाटील यांनी दूध संकलन केंद्रांच्या वीजदरांबाबत प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, दूध संकलन केंद्रांमध्ये वापरल्या जाणाऱ्या चिलर्ससाठी पूर्वी औद्योगिक किंवा वाणिज्य श्रेणीतील जास्त दर आकारले जात होते. मात्र चिलर्स हे दूध संकलनासाठी अत्यावश्यक असल्याने या वापरासाठी स्वतंत्र दर लागू करण्याची मागणी सरकारने नियामक आयोगाकडे केली होती. आयोगाने याबाबत सकारात्मक निर्णय घेतला आहे. नव्या निर्णयानुसार, लघुदाब वाणिज्य श्रेणीतील वीजदर १६ रुपये ५५ पैसे प्रति युनिटवरून ७ रुपये ३१ पैसे प्रति युनिट इतका करण्यात आला आहे. तसेच उच्चदाब वाणिज्य श्रेणीतील दर १३ रुपये ८१ पैसेवरून ९ रुपये ६ पैसे प्रति युनिट करण्यात आला आहे. या निर्णयामुळे दूध संकलन उद्योगांना मोठा दिलासा मिळणार असून त्याचा फायदा थेट शेतकऱ्यांनाही होईल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. तसेच भविष्यात सौर ऊर्जेवर आधारित शीतगृह आणि सोलर-हायब्रिड मॉडेलचा वापर करण्याबाबतही सरकार विचार करत असल्याचे त्यांनी सांगितले.

## २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलरचे लक्ष्य : मुख्यमंत्री फडणवीस

# महाराष्ट्राची अर्थव्यवस्था वाढतेय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : महाराष्ट्राची अर्थव्यवस्था गेल्या दहा वर्षांत मोठ्या वेगाने वाढली असून राज्य स्वतंत्र देश असते, तर जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था ठरली असती, असा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केला. महाराष्ट्र सिंगापूर किंवा यूएईच्या स्पर्धेत नसून त्यांनाही मागे टाकण्याच्या तयारीत असल्याचे त्यांनी सांगितले.

अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था सध्या सुमारे ६६० अब्ज डॉलर्स इतकी आहे. २०३०-३१ पर्यंत ती १ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचवण्याचे आणि २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवण्याचे राज्याचे उद्दिष्ट आहे. महाराष्ट्राने ऑस्ट्रिया, थायलंड, नॉर्वे, फिलिपाईन्स, व्हिएतनाम आणि बांगलादेश या देशांच्या अर्थव्यवस्थांना मागे टाकले असून येत्या दोन ते तीन वर्षांत यूएई आणि सिंगापूरलाही मागे टाकण्याची क्षमता असल्याचा दावा त्यांनी केला. परकीय थेट गुंतवणूक, बिगर-तेल निर्यात, स्टार्टअप्स, युनिकॉर्न कंपन्या, बँकांतील ठेवी, कर्जवाटप, जीएसटी संकलन आणि वृक्ष आच्छादन या अनेक निकषांमध्ये महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर असल्याचे त्यांनी नमूद केले.

राज्याच्या कर्जाबाबत बोलताना फडणवीस म्हणाले की, राज्याचे उत्पन्न सुमारे ५१ लाख कोटी रुपयांनी वाढले असल्याने ९.३२ लाख कोटी रुपयांचे कर्ज चिंतेचे कारण नाही. कर्ज आणि जीडीपीचे गुणोत्तर १८.२ टक्के असून ते राज्याच्या मजबूत आर्थिक स्थितीचे लक्षण आहे. पंजाब आणि केरळसारख्या राज्यांमध्ये हे प्रमाण ३५ ते ४६ टक्क्यांपर्यंत असताना महाराष्ट्र २५ टक्क्यांच्या मर्यादेत राहूनही वेगाने विकास करत असल्याचे त्यांनी सांगितले.

फडणवीस म्हणाले की, सरकार आर्थिक शिस्त पाळून विकास करत आहे. 'लाडकी बहीण'सारख्या योजनांची अंमलबजावणी करूनही राज्याची राजकोषीय तूट तीन टक्क्यांच्या मर्यादेत ठेवण्यात यश आले आहे. मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ता योजनेसाठी एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत शेत रस्त्यांसाठी प्रति किलोमीटर १५ लाख रुपये दिले जाणार असून गौण खनिजावरील स्वामित्व शुल्कही माफ करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

सामाजिक न्याय आणि आदिवासी विभागाच्या निधीत कपात झाल्याच्या आरोपांनाही त्यांनी फेटाळून लावले. सामाजिक न्याय विभागाचा ७६ टक्के आणि आदिवासी विभागाचा ८३ टक्के निधी वितरित करण्यात आला असून त्यातील मोठा हिस्सा ३१ मार्चपर्यंत खर्च होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

फडणवीस म्हणाले की, २०१३-१४ मध्ये २५ हजार कोटी रुपयांचा असलेला भांडवली खर्च आता दोन लाख कोटी रुपयांपर्यंत वाढला आहे. प्रधानमंत्री आवास योजनेतून ग्रामीण भागात ३० लाख नवीन घरे बांधण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला असून त्यामध्ये रूफटॉप सोलरसह वीज बिल शून्यावर आणण्याचा सरकारचा मास्टर प्लॅन आहे. तसेच मराठवाड्यासाठी ८७ हजार कोटी रुपयांचा महत्त्वाकांक्षी जलप्रकल्प आणि उल्हास खोऱ्यातून ७८ टीएमसी पाणी वळवण्याची योजना ही राज्याच्या भविष्यासाठी केलेली मोठी गुंतवणूक असल्याचे त्यांनी सांगितले.

## चार धाम यात्रेपूर्वी महत्त्वाचा निर्णय

# बद्रीनाथ-केदारनाथसह मंदिरांत गैर-हिंदूंना प्रवेशबंदी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**डेहराडून** : आगामी चार धाम यात्रेच्या पार्श्वभूमीवर बद्री-केदार मंदिर समितीने (बीकेटीसी) महत्त्वाचा निर्णय घेत बद्रीनाथ आणि केदारनाथसह आपल्या अधिकारक्षेत्रातील ४७ मंदिरांमध्ये गैर-हिंदूंना प्रवेश देण्यास बंदी घालणारा ठराव मंजूर केला आहे. या निर्णयामुळे देशभरात चर्चा सुरू झाली आहे.

देहराडून येथील समितीच्या कॅम्प कार्यालयात मंगळवारी अध्यक्ष हेमंत द्विवेदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या अर्थसंकल्पीय बैठकीत हा निर्णय अंतिम करण्यात आला. ठरावानुसार केवळ सनातन धर्माचे अनुयायी असलेल्या भाविकांनाच मंदिर परिसर आणि संबंधित स्थळांच्या गर्भगृहात प्रवेश दिला जाणार आहे.

या निर्णयामागील भूमिका स्पष्ट करताना समितीचे अध्यक्ष हेमंत द्विवेदी यांनी सांगितले की, हिंदुत्व आणि सनातन धर्मावर श्रद्धा असलेल्या भाविकांचे मंदिरात स्वागत आहे. मात्र सनातन धर्माचे पालन न करणाऱ्या व्यक्तींना मंदिर परिसरात प्रवेश दिला जाणार नाही. मंदिर परिसराचे पावित्र्य जपण्यासाठी समितीला हा अधिकार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. उत्तराखंडमधील विविध धार्मिक संस्थांकडून पवित्र स्थळांमध्ये गैर-हिंदू प्रवेशावर निर्बंध घालण्याची मागणी वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले जाते. यापूर्वी हरिद्वारमधील गंगा सभेने हर की पौडी परिसरातही अशाच प्रकारच्या निर्बंधांची मागणी केली होती.

प्रमुख तीर्थक्षेत्रांमध्ये अशाच नियमांची अंमलबजावणी करण्याबाबत धार्मिक संघटनांकडून मागणी वाढत आहे. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनीही मंदिर व्यवस्थापन समित्या आणि धार्मिक संस्थांच्या मतांचा आदर केला जाईल, असे यापूर्वी सूचित केले होते. यंदाची चार धाम यात्रा १९ एप्रिलपासून सुरू होणार असून त्या दिवशी गंगोत्री आणि यमुनोत्री मंदिरांचे दरवाजे उघडले जाणार आहेत. यात्रेसाठी नोंदणी ६ मार्चपासून सुरू झाली असून लाखो भाविकांच्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून तयारी सुरू आहे.

मंदिर परिसराचे पावित्र्य राखण्यासाठी यापूर्वीच मोबाईल फोन वापरण्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. नव्या निर्णयामुळे मंदिर व्यवस्थापनाच्या धोरणात आणखी मोठा बदल झाल्याचे मानले जात आहे.

## होर्मुझ सामुद्रधुनीत जहाजावर हल्ला

**नवी दिल्ली** : मध्य-पूर्वेतील युद्धाचे पडसाद आता समुद्री मार्गांवरही उमटू लागले आहेत. होर्मुझ सामुद्रधुनीत थायलंडच्या झेंड्याखाली धावणाऱ्या एका मालवाहू जहाजावर बुधवारी क्षेपणास्त्र हल्ला करण्यात आला. हे जहाज भारतातील गुजरातमधील कांडला बंदराच्या दिशेने येत होते. हल्ल्यानंतर जहाजाला आग लागली असून २३ पैकी २० खलाशांना वाचवण्यात यश आले आहे. मात्र तीन खलाशी अद्याप बेपत्ता असल्याची माहिती रॉयल थाई नेव्हीने दिली. हे जहाज संयुक्त अरब अमिरातीतील खलीफा बंदरातून निघून गुजरातमधील कांडला बंदराच्या दिशेने जात होते.

## नितीन गडकरी - रोहित पवार यांची भेट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : आमदार रोहित पवार यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची दिल्लीत भेट घेत विविध विकास प्रकल्पांना दिवंगत अजित पवार यांचे नाव देण्याची विनंती केली. पुणे रिंग रोड, तळेगाव-चाकण-शिक्रापूर उन्नत महामार्ग तसेच पुणे-शिरूर उन्नत महामार्गाला अजित पवार यांचे नाव देण्याबाबत त्यांनी गडकरी यांच्याशी चर्चा केली.

रोहित पवार यांनी सांगितले की, नितीन गडकरी आणि दिवंगत अजित पवार यांच्यात अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. एखाद्या विकास प्रकल्पाची उभारणी होत असतानाच त्या प्रकल्पामागे योगदान असलेल्या व्यक्तिमत्त्वाचे नाव देणे अधिक योग्य ठरते. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर नाव बदलणे योग्य नसल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.

या मागणीवर प्रतिक्रिया देताना गडकरी यांनी अशा निर्णयासाठी ठरावीक प्रक्रिया असल्याचे सांगितले. संबंधित प्रस्तावासंदर्भात आवश्यक कागदपत्रे आणि प्रक्रिया पूर्ण करून पाठपुरावा करण्याचे आश्वासन त्यांनी दिल्याची माहिती रोहित पवार यांनी दिली.

दरम्यान, दिवंगत अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत संसदेतील चर्चेचा मुद्दाही रोहित पवार यांनी उपस्थित केला. ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी स्थगन प्रस्तावाद्वारे या विषयावर चर्चा घडवून आणण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांना बोलण्याची संधी दिली गेली नाही, असे त्यांनी सांगितले.

या अपघाताच्या पारदर्शक चौकशीसाठी संसदेच्या अधिवेशनादरम्यान खासदार सुप्रिया सुळे यांच्या माध्यमातून इंडिया आघाडीतील नेत्यांशी संपर्क साधून पाठपुरावा सुरू असल्याचेही रोहित पवार यांनी सांगितले.

या संदर्भात त्यांनी काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांची भेट घेतल्यानंतर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचीही भेट घेऊन चर्चा केल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## विविध निमलष्करी दलांमध्ये जागा; केंद्र सरकारची राज्यसभेत माहिती

# सीआरपीएफमध्ये ९३ हजारांहून अधिक पदे रिक्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली** : देशातील केंद्रीय सशस्त्र पोलिस दलांमध्ये (सीआरपीएफ) मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असल्याची माहिती केंद्र सरकारने राज्यसभेत दिली. विविध निमलष्करी दलांमध्ये एकूण ९३ हजार १३९ पदे रिक्त असून ही संख्या मंजूर पदांच्या सुमारे ८.५ टक्के इतकी आहे.

खासदार अशोक मित्तल यांनी विचारलेल्या प्रश्नाला लेखी उत्तर देताना केंद्रीय गृहराज्यमंत्री नित्यानंद राय यांनी ही माहिती दिली. १ जानेवारी २०२६ पर्यंतची ही आकडेवारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सादर करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलात (सीआयएसएफ) सर्वाधिक रिक्त पदे आहेत. या दलात सुमारे १७.७ टक्के म्हणजेच २८ हजार ३४२ पदे रिक्त आहेत. त्यानंतर केंद्रीय राखीव पोलिस दलात (सीआरपीएफ) २७ हजार ४०० पदे रिक्त असून हा दर सुमारे ९ टक्के आहे. देशातील अंतर्गत सुरक्षा राखणे आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी राज्य पोलिसांना मदत करणे ही सीआरपीएफची प्रमुख जबाबदारी आहे.

भारत-चीन सीमेच्या सुरक्षेची जबाबदारी असलेल्या इंडो-तिबेटीयन बॉर्डर पोलिस दलात (आयटीबीपी) १३.२ टक्के म्हणजे १२ हजार ३३३ पदे रिक्त आहेत. तर भारताच्या पाकिस्तान आणि बांगलादेश सीमेचे रक्षण करणाऱ्या सीमा सुरक्षा दलात (बीएसएफ) १४ हजार ५३१ पदे रिक्त असून हा दर ५.६ टक्के आहे. याशिवाय नेपाळ आणि भूतान सीमेच्या सुरक्षेसाठी कार्यरत असलेल्या सशस्त्र सीमा दलात ६ हजार ७८४ पदे रिक्त आहेत, ज्याचा दर ७.२ टक्के आहे. म्यानमार सीमेवर तैनात असलेल्या आसाम रायफल्समध्येही सुमारे ६ टक्के म्हणजे ३ हजार ७४९ पदे रिक्त असल्याची माहिती देण्यात आली.

दरम्यान, ही रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सातत्याने सुरू असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. एप्रिल २०२३ ते फेब्रुवारी २०२४ या कालावधीत गृह मंत्रालयाने ६७ हजार ३४५ कर्मचाऱ्यांची भरती केली आहे. तसेच आणखी ६४ हजार ९१ पदांसाठी अधिसूचना काढण्यात आली असून ही भरती प्रक्रिया विविध टप्प्यांवर सुरू आहे.

याशिवाय केंद्रीय लोकसेवा आयोगाने अलीकडेच सहाय्यक कमांडंट पदासाठी ३४९ जागांची अधिसूचना जाहीर केली आहे. सर्व सीएपीएफ आणि आसाम रायफल्समध्ये रिक्त पदे वेळेत भरण्याचे निर्देश देण्यात आले असून कॉन्स्टेबल (जनरल ड्युटी), उपनिरीक्षक आणि सहाय्यक कमांडंट पदांच्या भरतीसाठी संबंधित दलांमध्ये नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहितीही गृहराज्यमंत्र्यांनी सभागृहाला दिली.

## टेक कंपन्या आणि बँकांवर हल्ल्याचा इराणचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाला १२ दिवस पूर्ण झाले असून या युद्धाचा परिणाम जागतिक पातळीवर जाणवू लागला आहे. या पार्श्वभूमीवर इराणने अमेरिकेशी आणि इस्रायलशी संबंधित टेक कंपन्या तसेच आर्थिक संस्थांवर हल्ला करण्याचा इशारा दिल्याने मध्य-पूर्वेतील तणाव आणखी वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

इराणच्या खातम अल-अनबिया मुख्यालयाच्या प्रवक्त्याने हा इशारा दिला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या माहितीनुसार हे मुख्यालय इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सशी संबंधित मानले जाते. इराणमधील एका बँकेवर झालेल्या हल्ल्यानंतर हा इशारा देण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. प्रवक्त्याने म्हटले की, शत्रूंनी आमच्यावर हल्ला करून आमचे हात मोकळे केले आहेत. त्यामुळे आता अमेरिकन आणि इस्रायलशी संबंधित आर्थिक केंद्रे, टेक कंपन्या आणि बँकांवर हल्ले करण्याची शक्यता आहे.

संभाव्य हल्ल्यांचा धोका लक्षात घेता इराणकडून नागरिकांनाही सावध राहण्याचा इशारा देण्यात आला आहे. अशा बँका, आर्थिक केंद्रे किंवा कंपन्यांपासून किमान एक किलोमीटर अंतर ठेवावे, असे आवाहन करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित भागात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## संपादकीय

# संरक्षणाचा हिशेब




**बिआर्थिक प्रगतीचा दावा करणाऱ्या राष्ट्रासाठी सुरक्षेचा प्रश्न दुय्यम असू शकत नाही. परंतु भारताच्या संरक्षण खर्चाच्या आकडेवारीकडे पाहिले असता एक विचित्र वास्तव समोर येते. सुरक्षेच्या वाढत्या आव्हानांमध्येही संरक्षण खर्चाचा वाटा मर्यादितच राहिला आहे.**

भारताच्या सार्वजनिक चर्चेत संरक्षणाचा विषय बहुतेक वेळा भावनांच्या पातळीवर येतो. सीमेवरील तणाव, दहशतवाद, युद्धसज्जतेचे दावे या सर्व गोष्टी राजकीय भाषणांमध्ये नियमितपणे ऐकायला मिळतात. पण या भाषणांमागे एक साधा प्रश्न दडलेला असतो: देश खरोखरच संरक्षणासाठी पुरेसा खर्च करतो आहे का? या प्रश्नाचे उत्तर आकडेवारीत दडलेले आहे. २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात भारताचा संरक्षण खर्च सुमारे ६.८१ लाख कोटी रुपये इतका आहे. हा मागील वर्षाच्या तुलनेत वाढलेला असला, तरी देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनाच्या तुलनेत तो सुमारे १.९ टक्क्यांपर्यंतच मर्यादित आहे. ही टक्केवारीच चर्चेचा केंद्रबिंदू आहे. कारण भारतासारख्या मोठ्या आणि भू-राजकीयदृष्ट्या संवेदनशील देशासाठी हा खर्च कितपत पुरेसा आहे, यावर प्रश्न उपस्थित होतात. विशेषतः जेव्हा देशाच्या सीमांवर दोन अण्वस्त्रधारी प्रतिस्पर्धी आहेत, पश्चिमेला पाकिस्तान आणि उत्तरेला चीन. या संदर्भात भारताची तुलना इतर देशांशी केल्यास चित्र अधिक स्पष्ट होते. अनेक पाश्चात्त्य देशांनी संरक्षण खर्चासाठी सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या किमान दोन टक्के खर्च करण्याचे लक्ष्य स्वीकारले आहे. काही देश तर त्यापेक्षाही अधिक खर्च करण्याचा विचार करत आहेत. अशा परिस्थितीत भारताचा १.९ टक्क्यांपर्यंतचा खर्च काहीसा मितव्ययी वाटतो. यामागे एक महत्त्वाचे कारण आहे. भारताच्या संरक्षण बजेटचा मोठा हिस्सा पगार, भत्ते आणि निवृत्तीवेतन यावर खर्च होतो. आधुनिक शस्त्रसज्जतेसाठी आवश्यक असलेल्या भांडवली गुंतवणुकीसाठी तुलनेने कमी निधी उरतो. त्यामुळे सैन्याच्या आधुनिकीकरणाची प्रक्रिया अनेकदा विलंबित होते. याचा परिणाम दीर्घकालीन क्षमतांवर होतो. युद्धसज्जता म्हणजे केवळ सैनिकांची संख्या नव्हे; त्यामागे तंत्रज्ञान, उपकरणे, संशोधन आणि उत्पादन क्षमता यांचा मोठा भाग असतो. उदाहरणार्थ, आधुनिक युद्धात उपग्रह, सायबर क्षमता, ड्रोन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचे महत्त्व वाढत आहे. या सर्व क्षेत्रांमध्ये सातत्यपूर्ण गुंतवणूक आवश्यक असते. भारताने या दिशेने काही पावले उचलली आहेत. देशांतर्गत संरक्षण उत्पादन वाढवण्यावर सरकारचा भर आहे. आज भारत सुमारे ६५ टक्के संरक्षण उपकरणे देशातच तयार करतो आणि पुढील काळात पूर्ण स्वावलंबनाचे लक्ष्य ठेवले आहे. तसेच संरक्षण उद्योगातून निर्यात वाढवण्याचाही प्रयत्न सुरू आहे. अलीकडच्या काळात भारताने अनेक देशांना शस्त्रास्त्रे निर्यात करण्यास सुरुवात केली आहे. परंतु स्वावलंबनाचा मार्गही सोपा नाही. संरक्षण उद्योग अत्यंत भांडवली, तांत्रिक आणि दीर्घकालीन नियोजनावर आधारित असतो. एखादे आधुनिक लढाऊ विमान किंवा क्षेपणास्त्र प्रणाली विकसित करण्यासाठी दशकभराचा कालावधी आणि प्रचंड गुंतवणूक लागते. त्यामुळे केवळ घोषणांपेक्षा सातत्यपूर्ण निधीची गरज अधिक असते. याच ठिकाणी भारतासमोरची आर्थिक वास्तवता उभी राहते. शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा, सामाजिक कल्याण या सर्व क्षेत्रांवरही सरकारला खर्च करावा लागतो. त्यामुळे संरक्षणासाठी अधिक निधी देणे म्हणजे इतर क्षेत्रांवरील खर्च कमी करणे किंवा तूट वाढवणे, असा प्रश्न निर्माण होतो. पण संरक्षण हा खर्च नसून विमा आहे, अशी एक जुनी म्हण आहे. त्याची किंमत युद्धाच्या वेळी नव्हे तर युद्ध टाळण्यासाठी मोजावी लागते. जर संरक्षण क्षमता पुरेशी मजबूत असेल, तर शत्रू हल्ला करण्यापूर्वीच दोनदा विचार करतो. भारताच्या बाबतीत हा मुद्दा अधिक महत्त्वाचा ठरतो. गेल्या काही वर्षांत सीमांवरील तणाव वाढलेला आहे. लडाखमधील परिस्थिती असो किंवा हिंद महासागरातील सामरिक स्पर्धा या सर्व घडामोडी देशाला दीर्घकालीन तयारीची आठवण करून देतात. त्यामुळे संरक्षण खर्चाच्या चर्चेत केवळ आकडे वाढवण्याचा प्रश्न नाही. खरी गरज आहे ती नियोजनाची. सैन्यदलांच्या गरजा, तांत्रिक प्राधान्यक्रम आणि उद्योगक्षमता यांचा एकत्रित विचार करून दीर्घकालीन धोरण आखणे आवश्यक आहे. संरक्षणाचा प्रश्न भावनांचा नाही; तो गणिताचा आहे. या गणितात चूक झाली तर त्याची किंमत इतिहासाला मोजावी लागते. भारतासारख्या उदयोन्मुख शक्तीसाठी हा धडा विसरणे परवडणारे नाही.

# निवडणूक आयोगाचे अल्गोरिदमचे राजकारण

भारतीय लोकशाहीची एक वैशिष्ट्यपूर्ण ताकद म्हणजे निवडणूक प्रक्रिया. या प्रक्रियेचा सर्वांत महत्त्वाचा पाया म्हणजे मतदार यादी. ती अचूक असेल तर लोकशाहीची इमारत स्थिर राहते; आणि ती ढळली तर संपूर्ण प्रक्रियेवर संशयाची सावली पडते. पश्चिम बंगालमध्ये सुरू असलेल्या 'स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन' या मतदार यादी पुनरावलोकन प्रक्रियेत नेमके हेच घडताना दिसत आहे.




**» लोकशाहीत मतदार यादी ही नागरिकत्व आणि अधिकार यांची पायाभरणी आहे. बंगालमध्ये मतदार यादीच्या विशेष पुनरावलोकनात अल्गोरिदम, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि प्रशासन यांच्या माध्यमातून उभे राहिलेले प्रश्न आता तांत्रिक न राहता राजकीय बनले आहेत.**

अनेक मतदारांना अचानक नोटिसा मिळू लागल्या. कारण म्हणून सांगितले गेले ते 'लॉजिकल डिस्क्रेपन्सी' म्हणजे नोंदींमधील तर्कशुद्ध विसंगती. काही ठिकाणी वडिलांच्या नावाच्या स्पेलिंगमधील किरकोळ फरक, तर काही ठिकाणी जन्मतारखेतील बदल अशा छोट्या त्रुटींमुळे लोकांना सुनावणीसाठी हजर राहण्याचे आदेश देण्यात आले. अशा विसंगतींची संख्या कोट्यवधींच्या घरात गेल्याचे समोर आले. एका अंदाजानुसार सुमारे १.३६ कोटी मतदारांच्या नोंदींमध्ये 'लॉजिकल डिस्क्रेपन्सी' आढळल्याचे सांगितले गेले.

यातील गंमत म्हणजे या त्रुटींपैकी अनेक तांत्रिक प्रक्रियेतून निर्माण झाल्या. जुन्या, विशेषतः २००२ सालच्या मतदार याद्या डिजिटायझेशन करताना नावे आणि तपशील संगणकीय प्रणालीने चुकीच्या प्रकारे जुळवले. काही वेळा एकाच नावाच्या वेगवेगळ्या व्यक्तींना एकाच कुटुंबाशी जोडले गेले, तर काही ठिकाणी नातेसंबंधांची संपूर्ण रचना बदलून गेली. परिणामी हजारो नागरिकांना आपले नागरिकत्व आणि मताधिकार सिद्ध करण्यासाठी सरकारी कार्यालयांचे फेरे मारावे लागले.

यामुळे निर्माण झालेली अडचण केवळ प्रशासकीय नाही. ती लोकशाहीच्या तत्त्वांशी निगडित आहे. कारण मतदार यादीतील नाव वगळले जाणे म्हणजे प्रत्यक्षात नागरिकाला मतदानाच्या अधिकारापासून वंचित ठेवणे होय. आणि ही प्रक्रिया जर अल्गोरिदमच्या त्रुटींवर आधारित असेल, तर तिचे परिणाम अधिक गंभीर ठरू शकतात.

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनीही या प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित केले. त्यांचा आरोप असा की, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित डिजिटायझेशनमुळे अनेक खऱ्या मतदारांना त्रास सहन करावा लागत आहे आणि प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव आहे. विरोधकांनीही ही प्रक्रिया राजकीय हेतूने चालवली जात असल्याचा आरोप केला आहे. प्रशासन अर्थातच हे आरोप फेटाळते. त्यांचे म्हणणे असे की मतदार यादी स्वच्छ ठेवण्यासाठी ही प्रक्रिया आवश्यक आहे.

या वादातून एक मोठा प्रश्न पुढे येतो. तंत्रज्ञानावर आधारित प्रशासन म्हणजे नेमके काय? आज जगभर शासन व्यवस्थांमध्ये अल्गोरिदमचा वापर वाढत आहे. करप्रणाली, वाहतूक नियंत्रण, आरोग्य व्यवस्था. सर्वत्र संगणकीय प्रणाली निर्णय प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. परंतु या प्रणालींची मर्यादा आहे. कारण अल्गोरिदम तर्कावर चालतो; समाज मात्र मानवी वास्तवांवर.

उदाहरणार्थ, भारतात नावांच्या स्पेलिंगमध्ये फरक असणे ही अत्यंत सामान्य बाब आहे. एका कागदपत्रात 'कुमार', दुसऱ्यात 'कुमर' किंवा 'कुमार'चा अभाव अशा बदलांना सामाजिक संदर्भात फारसे महत्त्व नसते. पण संगणकीय प्रणालीसाठी ते वेगवेगळे व्यक्तिमत्त्व ठरू शकते. त्यामुळे अल्गोरिदमचा वापर करताना मानवी पडताळणी ही अनिवार्य ठरते.

पश्चिम बंगालमधील अनुभव या संदर्भात एक महत्त्वाचा धडा देतो. तंत्रज्ञानाने प्रशासन सुलभ होऊ शकते; पण ते लोकशाही प्रक्रियेचे पर्याय बनू शकत नाही. विशेषतः मतदार यादीसारख्या संवेदनशील विषयात तांत्रिक चुका लोकांच्या अधिकारांवर परिणाम करू शकतात.

यामुळे निवडणूक आयोगासमोर दुहेरी जबाबदारी उभी राहते. एकीकडे मतदार यादी अचूक ठेवणे आवश्यक आहे; दुसरीकडे नागरिकांना अनावश्यक त्रास होणार नाही याची काळजी घेणेही तेवढेच महत्त्वाचे आहे. या दोन्ही गोष्टींचा समतोल राखणे हीच खरी कसोटी ठरणार आहे.

लोकशाहीत अल्गोरिदम उपयुक्त साधन असू शकतो; पण अंतिम निर्णय मानवी विवेकानेच घेतला पाहिजे. अन्यथा तंत्रज्ञानाच्या नावाखाली प्रशासनिक चुका राजकीय वादात परिवर्तित होतात. पश्चिम बंगालमधील मतदार यादीचा वाद हेच दाखवून देतो की लोकशाहीचे गणित केवळ कोड आणि डेटा यावर चालत नाही, तर ते विश्वासावर चालते.

# नागरी सेवांच्या तांत्रिक व्यवस्थापनाची घेतली माहिती

## इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटरला महापौर रवि लांडगे यांची भेट

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निगडी येथील इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटरला महापौर रवि लांडगे यांनी भेट देऊन शहरातील विविध नागरी सेवांचे तांत्रिक पद्धतीने होणारे मॉनिटरिंग व नियंत्रण व्यवस्थेची माहिती घेतली.

स्मार्ट सिटी संकल्पनेअंतर्गत उभारण्यात आलेल्या या कमांड सेंटरच्या माध्यमातून शहरातील नागरी सेवा, वाहतूक व्यवस्था, स्वच्छता व्यवस्थापन तसेच आपत्कालीन परिस्थितीतील प्रतिसाद प्रणालीचे एकाच ठिकाणाहून रिअल-टाईम निरीक्षण केले जाते. या प्रणालीमुळे शहरातील विविध घडामोडींवर त्वरित लक्ष ठेवणे आणि संबंधित विभागांशी समन्वय साधून आवश्यक ती कार्यवाही करणे अधिक सुलभ झाल्याची माहिती कार्यकारी अभियंता अभिमान भोसले यांनी महापौरांना दिली.

यावेळी महापौर लांडगे यांनी शहरातील सीसीटीव्ही सर्व्हेलन्स यंत्रणा, वाहतूक नियंत्रण व्यवस्था, स्वच्छता व्यवस्थापन प्रणाली तसेच विविध विभागांचे रिअल-टाईम मॉनिटरिंग याबाबत माहिती घेतली. नागरिकांना सुरक्षित, सुकर आणि अधिक कार्यक्षम नागरी सेवा देण्यासाठी इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटरची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले.

महापालिकेच्या वतीने शहरभरातील एकूण ८ हजार ७९० सीसीटीव्ही कॅमेरे नियंत्रण प्रणालीशी जोडण्यात आले आहेत. या कॅमेऱ्यांच्या माध्यमातून प्रमुख चौक, रस्ते तसेच सार्वजनिक ठिकाणांवर देखरेख ठेवली जात आहे. त्यापैकी ३ हजार ८२७ कॅमेरे कार्यरत असून त्यांचे थेट प्रक्षेपण कमांड सेंटरमधून पाहता येते. काही कॅमेरे देखभाल, दुरुस्ती किंवा तांत्रिक कारणांमुळे तात्पुरते बंद असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. बंद कॅमेरे पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित तांत्रिक पर्यायांचा वापर करण्याबाबतही चर्चा झाली.

# पुण्यात उष्णतेचा तडाखा; कोरेगाव पार्क, लोहगावमध्ये पारा ३९ अंशांवर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : शहरात उन्हाचा तडाखा वाढू लागला असून कोरेगाव पार्क आणि लोहगाव परिसर उष्णतेचे हॉटस्पॉट ठरत आहेत. गेल्या दोन दिवसांपासून या भागातील तापमान ३९ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचल्याने नागरिक उकाड्याने हैराण झाले आहेत.

यंदा शहरात उष्णतेची सुरुवात मागील वर्षाच्या तुलनेत थोडी उशिरा झाली आहे. गतवर्षी फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यापासूनच उष्मा जाणवत होता. ५ मार्चपासून तापमानात अचानक वाढ होऊन पारा ३५ ते ३६ अंशांपर्यंत गेला. ८ मार्च रोजी कोरेगाव पार्क आणि लोहगाव येथे तापमान यंदा प्रथमच ३९ अंशांवर पोहोचले. शहरातील इतर भागांमध्ये तापमान ३६ ते ३८ अंशांदरम्यान असले तरी वाऱ्याचा वेग कमी झाल्याने उष्णता अधिक जाणवत आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते कोरेगाव पार्क आणि लोहगाव परिसर उष्णतेची बेटं म्हणजेच 'हीट आयलंड' बनले आहेत. अतिनागरीकरण, सिमेंटचे रस्ते, उड्डाणपूल आणि उंच इमारती यामुळे या भागात इतर भागांच्या तुलनेत २ ते ३ अंशांनी जास्त तापमान नोंदवले जात आहे.

पाषाण, लवळे, मगरपट्टा आणि एनडीए परिसरात ३६ अंश तापमानाची नोंद झाली. नागरिकांनी उष्माघात टाळण्यासाठी दुपारच्या वेळेत बाहेर पडणे टाळावे, पुरेसे पाणी पिणे आणि आरोग्याची काळजी घेणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले आहे.

# सोने-चांदीच्या किमतीत पुण्यात जोरदार वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात वाढत चाललेल्या युद्धस्थितीमुळे जागतिक बाजारपेठेत अस्थिरता निर्माण झाली आहे. त्यातच कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींचा परिणाम सराफा बाजारावरही दिसून येत असून पुण्यात सोन्या-चांदीच्या दरात मोठी वाढ झाली आहे.

पुण्यातील सराफा बाजारात मंगळवारी (१० मार्च) सोन्याच्या दरात तोळ्यामागे सुमारे १ हजार ७०० रुपयांची वाढ झाली, तर चांदीच्या दरात किलोमागे तब्बल १३ हजार रुपयांची वाढ नोंदवली गेली. त्यामुळे जीएसटीसह सोन्याचा प्रतितोळा दर सुमारे १ लाख ६४ हजार रुपयांवर पोहोचला असून चांदीचा किलोचा दर २ लाख ८१ हजार रुपयांपर्यंत गेला आहे. इराण आणि अमेरिकेमधील तणाव आणखी वाढल्यास किंवा कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये पुन्हा वाढ झाल्यास सोन्या-चांदीच्या दरात आणखी तेजी येऊ शकते. मात्र अमेरिकेचे आर्थिक आकडे अपेक्षेपेक्षा चांगले आले आणि डॉलर मजबूत झाला, तर त्याचा दबाव सोन्याच्या दरांवर पडू शकतो. सोन्याच्या किमती सातत्याने वाढत असल्याने ते सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जात आहे. परिस्थिती पूर्ववत न झाल्यास किमतींचा अंदाज बांधणेही कठीण होऊ शकते.

# नागरिकांना केंद्रबिंदू मानून शहर सुधारण्याची संरचना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांच्या मूलभूत गरजा लक्षात घेऊन त्यांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी नागरिकांना केंद्रबिंदू मानून शहर सुधारण्याची सर्वसमावेशक संरचना तयार करण्यात येणार असल्याची माहिती शहर सुधारणा समितीचे सभापती संजय नाना काटे यांनी दिली. शहराचा विकास करताना आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण आणि सुरक्षिततेला प्राधान्य देत नियोजनबद्ध पद्धतीने कामे राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.



महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत माजी महापौर मधुकरराव पवळे सभागृहात शहर सुधारणा समितीची बैठक सभापती काटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत शहर विकासाशी संबंधित विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीस माजी महापौर तथा नगरसदस्या वैशाली घोडेकर-लोंढे, नगरसदस्या वैशाली काळभोर, अर्चना सस्ते, नगरसदस्य डॉ. सुहास कांबळे, उत्तमराव केंदळे, अनंत कोऱ्हाळे यांच्यासह नगरसचिव मुकेश कोळप, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, उपायुक्त अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता हरविंदर सिंह बन्सल, विशेष अधिकारी किरण गायकवाड तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी नियमित साफसफाई, कचरा संकलन व कचरा व्यवस्थापनावर विशेष भर देण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच शहरातील व्यापार व उद्योगांना आवश्यक असलेल्या परवानग्या पारदर्शक व सुलभ पद्धतीने देण्याबाबत संबंधित विभागांना निर्देश देण्यात आले.

मोशी येथे उभारण्यात येत असलेल्या दुसऱ्या 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाच्या कामाला गती देण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. या प्रकल्पामुळे शहरातील कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी होऊन पर्यावरण संवर्धनास मदत होणार असल्याचे सांगण्यात आले. तसेच विकास आराखड्यासंदर्भातील (डीपी) हरकती व सूचना लवकर निकाली काढून शहराचा नियोजनबद्ध विकास साधण्यावर भर देण्याचेही स्पष्ट करण्यात आले.

## उपमहापौर शर्मिला बाबर यांचे आवाहन

# प्रत्येक महिलेने वेळ राखून छंद जोपासावेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : महिला कर्मचाऱ्यांनी कर्तव्य बजावताना आपल्या आरोग्याकडे आणि वैयक्तिक आयुष्याकडेही तितक्याच गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. कामाच्या धकाधकीत अनेकदा महिला स्वतःकडे दुर्लक्ष करतात; मात्र निरोगी शरीर आणि सकारात्मक मन असेल तरच त्या कुटुंब, समाज आणि कार्यस्थळी अधिक प्रभावीपणे योगदान देऊ शकतात. त्यामुळे प्रत्येक महिलेने दिवसातून थोडा तरी वेळ स्वतःसाठी राखून ठेवत आवडते छंद जोपासावेत, असे आवाहन पिंपरी-चिंचवडच्या उपमहापौर शर्मिला बाबर यांनी केले.




जागतिक महिला दिनानिमित्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात महिला कर्मचाऱ्यांसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या.

या कार्यक्रमास स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, क्रीडा, कला, सांस्कृतिक व साहित्य समितीचे सभापती कैलास कुटे, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी पठारे, नगरसदस्या अनुराधा गोरखे, पल्लवी वाल्हेकर, प्रियांका कुदळे यांच्यासह सहआयुक्त मनोज लोणकर, सहशहर अभियंता प्रेरणा सिनकर, उपआयुक्त चेतना केरूरे, संदीप खोत, मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच महापालिकेच्या महिला अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे म्हणाले की, महापालिकेत कार्यरत असलेल्या महिला कर्मचारी विविध विभागांमध्ये जबाबदाऱ्या सांभाळत शहराच्या प्रशासनात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. त्यांना कामाच्या ठिकाणी कोणत्याही अडचणी आल्यास त्यांना मदत करण्यासाठी पदाधिकारी नेहमीच तत्पर राहतील.

महिला कर्मचाऱ्यांना सुरक्षित आणि सन्मानजनक कार्यपरिसर उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची सामूहिक जबाबदारी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाची सुरुवात महापालिकेतील महिला कर्मचाऱ्यांच्या गुणदर्शन कार्यक्रमाने झाली. यामध्ये महिला कर्मचाऱ्यांनी समूह नृत्य आणि सोलो नृत्य सादर केले. लकी ड्रॉद्वारे पैठणीचे बक्षीसही देण्यात आले. याशिवाय महिला कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संदीप खोत यांनी केले, सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रमोद जगताप यांनी केले.

# गॅस सिलिंडरची दरवाढ मागे घ्यावी : काँग्रेस



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वडगाव मावळ** : अमेरिका व इराण यांच्यातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने घरगुती व व्यावसायिक वापराच्या गॅस सिलिंडरची दरवाढ केली आहे. या निर्णयाला मावळ तालुका काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी विरोध केला आहे. ही भाववाढ त्वरित रद्द करावी, अशी मागणी पक्षाने केली आहे.

मावळ तालुका काँग्रेसचे माजी अध्यक्ष बाळासाहेब ढोरे, माजी अध्यक्ष ॲड. दिलीप ढमाले, नितीन ढोरे आदींनी तहसीलदार विक्रम देशमुख यांची भेट घेऊन मागणीचे निवेदन दिले. त्यात म्हटले आहे की, "सध्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर शासनाने गॅस सिलिंडरची दरवाढ केली आहे. मात्र, या दरवाढीमुळे तालुक्यातील लोणावळा, खंडाळा, पवनानगर, नाणे, पवन व आंदर मावळातील हॉटेल व्यावसायिक अडचणीत आले आहेत. हॉटेलमध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या उपजीवीकेचा प्रश्न दरवाढीमुळे ऐरणीवर आला असून, ती मागे घेण्याची मागणी केली जाते आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### इंदापूर येथे तीन वाहनांचा अपघात

**इंदापूर** : इंदापूर शहराच्या बाह्य वळणावर ट्रक चालकाने अचानक ब्रेक लावल्यामुळे मागून येणाऱ्या दोन कार एकमेकांवर आदळल्याची घटना घडली. या अपघातात दोन्ही कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून सहा प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी जवळील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. इंदापूर शहराच्या बाह्य वळणावरून वाहतूक सुरू असताना पुढे जाणाऱ्या ट्रक चालकाने अचानक ब्रेक लावला. त्यामुळे मागून येणाऱ्या कार चालकांना वाहनांवर नियंत्रण ठेवता आले नाही आणि दोन्ही कार एकमेकांवर धडकल्या. या अपघातात दोन्ही कारचे मोठे नुकसान झाले असले तरी सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र या घटनेमुळे काही काळ परिसरात वाहतूक कोंडी निर्माण झाली होती.

### विद्यार्थिनीवर धारदार शस्त्राने हल्ला

**जुन्नर** : जुन्नर शहरात महाविद्यालयीन विद्यार्थिनीवर दिवसाढवळ्या धारदार शस्त्राने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली असून या प्रकारामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. आदिवासी मुलींच्या शासकीय वस्तीगृहासमोर ही घटना घडली असून जखमी विद्यार्थिनीवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. गौरी संजय सावळे (वय २०) ही महाविद्यालयीन विद्यार्थिनी सकाळी सुमारे दहा वाजण्याच्या सुमारास नेहमीप्रमाणे वस्तीगृह परिसरात होती. त्याच वेळी महेश मुरलीधर डामसे या तरुणाने अचानक तिच्यावर धारदार शस्त्राने हल्ला केला. आरोपीने तिच्या चेहऱ्यावर आणि मानेवर अनेक वार केले. दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. हल्ल्यानंतर आरोपी महेश डामसे घटनास्थळावरून फरार झाला. घटनास्थळी उपस्थित असलेल्या स्थानिक नागरिकांनी आणि विद्यार्थ्यांनी जखमी अवस्थेतील गौरी सावळे हिला तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल केले. तिच्यावर सध्या उपचार सुरू असल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला असून फरार आरोपीचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.

### जिल्हा प्रशासनाची धडक पावले; विशेष दक्षता पथके नेमणार

# गॅस सिलिंडरच्या काळाबाजारावर कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : घरगुती गॅस सिलिंडरच्या संभाव्य टंचाईच्या पार्श्वभूमीवर काळाबाजार रोखण्यासाठी पुणे जिल्हा प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. यासाठी विशेष दक्षता पथके नेमण्याचा निर्णय घेण्यात आला असून नागरिकांना योग्य दरात गॅस उपलब्ध व्हावा यासाठी तपासणी मोहीम राबविण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. जितेंद्र डुडी यांनी दिले आहेत.

युद्धजन्य परिस्थितीमुळे अलीकडच्या काळात घरगुती गॅस सिलिंडरची टंचाई निर्माण झाल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे येत होत्या. काही ठिकाणी गॅस एजन्सीमधून सिलिंडर बाहेर काढून जादा दराने विक्री होत असल्याची माहितीही समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी पुरवठा विभागाला विशेष तपासणी मोहीम राबविण्याच्या सूचना दिल्या आहेत.



या मोहिमेअंतर्गत जिल्हा पुरवठा अधिकारी, तहसीलदार, अन्न व औषध प्रशासन तसेच पोलिस विभागाच्या समन्वयातून विशेष दक्षता पथके तयार करण्यात येणार आहेत. ही पथके शहर आणि ग्रामीण भागातील गॅस एजन्सी, गोदामे आणि वितरण केंद्रांवर अचानक छापे टाकून तपासणी करणार आहेत. तपासणीदरम्यान अनियमितता आढळल्यास संबंधितांवर अत्यावश्यक वस्तू कायद्यान्वये कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

तपासणीदरम्यान गॅस सिलिंडरचा साठा, वितरणाची नोंद, ग्राहकांना दिलेले सिलिंडर तसेच औद्योगिक वापरासाठी होणारी विक्री याची तपशीलवार पडताळणी केली जाणार आहे. काळाबाजारात सिलिंडर विक्री करणाऱ्यांना दंडासह परवाना रद्द करण्याची कारवाईही केली जाणार असल्याची माहिती जिल्हा पुरवठा विभागाने दिली.

दरम्यान, गॅस सिलिंडरची जादा दराने विक्री होत असल्यास किंवा काळाबाजाराबाबत माहिती असल्यास नागरिकांनी त्वरित जिल्हा प्रशासनाच्या हेल्पलाईनवर तक्रार नोंदवावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद बैठकीत बोलताना डॉ. जितेंद्र डुडी यांनी ग्राहकांच्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन त्या प्राधान्याने सोडवण्याच्या सूचना दिल्या. १५ मार्च रोजी जागतिक ग्राहक दिनानिमित्त तालुकास्तरावर कार्यक्रम घेऊन ग्राहकांचे हक्क व कर्तव्यांविषयी जनजागृती करण्याचेही त्यांनी निर्देश दिले. तसेच नियमांचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## बारामतीत सिलिंडर बुकिंग पाच पटीने वाढले; वितरणावर परिणाम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती** : आखाती देशांतील युद्धाच्या पार्श्वभूमीवर गॅस सिलिंडरचा तुटवडा निर्माण होईल या भीतीने ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणात घरगुती गॅस सिलिंडरची नोंदणी केली जात आहे. बारामती शहरात गॅस सिलिंडर बुकिंग पाचपटीने वाढल्याने वितरणावर त्याचा परिणाम होत असून काही ठिकाणी सिलिंडर मिळविण्यासाठी ग्राहकांच्या रांगा लागल्याचे चित्र दिसत आहे. मात्र सध्या परिस्थिती नियंत्रणात असून टंचाईची स्थिती नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

बारामती शहरात भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्थान पेट्रोलियमच्या मिळून चार गॅस वितरकांकडून सेवा दिली जाते. या वितरकांकडून दररोज सुमारे अडीच हजार गॅस सिलिंडरचे वितरण केले जाते. आखाती देशांतील युद्धस्थिती गंभीर होत असल्याने सिलिंडरचा तुटवडा निर्माण होण्याची भीती ग्राहकांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे ग्राहकांनी मोठ्या प्रमाणावर बुकिंग केल्याने नोंदणीचे प्रमाण पाचपटीने वाढल्याची माहिती वितरकांनी दिली.

कंपनीकडून गॅस सिलिंडरची गाडी आल्यानंतर सिलिंडर उतरवून त्यांचे वितरण केले जाते आणि रिकाम्या टाक्या पुन्हा वाहनातून परत पाठविल्या जातात. सध्या कंपनीकडून पुरवठा सुरळीत सुरू असला तरी अचानक वाढलेल्या बुकिंगमुळे काही प्रमाणात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाल्याचे वितरकांनी सांगितले.

बुकिंगसाठी २५ दिवसांचे अंतर ठेवण्यात आले असून त्याचाही परिणाम जाणवत आहे. परिस्थिती लक्षात घेऊन सध्या हॉटेलांना गॅस सिलिंडरचा पुरवठा पूर्णपणे बंद करण्यात आला असून हॉस्पिटल आणि कंपन्यांना दिल्या जाणाऱ्या गॅस पुरवठ्यावरही काही प्रमाणात मर्यादा आणण्यात आल्या आहेत. मंगळवारी (दि.१०) बारामती येथील भारत गॅस एजन्सीच्या कार्यालयाबाहेर सिलिंडर खरेदीसाठी ग्राहकांच्या रांगा लागल्याचे दिसून आले.

## मुक्तादेवी यात्रेनिमित्त विविध कार्यक्रम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव** : आंबेगाव तालुक्यातील वळती येथे ग्रामदैवत मुक्तादेवी यात्रेनिमित्त सोमवार (दि.१६) ते बुधवार (दि.१८) या कालावधीत विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच मंगळवार (दि.१७) आणि बुधवार (दि.१८) या दोन दिवस बैलगाड्यांच्या भव्य शर्यती होणार असल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली आहे.

सोमवार (दि.१६) रोजी सकाळी ७ वाजता मुक्तादेवीच्या मूर्तीचा व मुखवट्याचा अभिषेक करण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी ९ वाजता चोळी-पातळ, शेरणी आणि मांडवडहाळे यांची पारंपरिक मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत मुक्तादेवीच्या नव्या चांदीच्या मुखवट्याची प्रतिष्ठापना करण्यात येणार असून कलशधारी महिला मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

दुपारी १२ वाजता कलगीवाले शाहीर नाना साळुंखे (श्रीगोंदा)



आणि तुरेवाले शाहीर अशोक भोर (वळती) यांच्यात कलगीतुऱ्याचा जंगी सामना रंगणार आहे. रात्री ९ वाजता छबिना मिरवणूक काढण्यात येणार आहे. मंगळवार (दि.१७) आणि बुधवार (दि.१८) रोजी बैलगाड्यांच्या भव्य शर्यतींचे आयोजन करण्यात आले आहे. या शर्यतींसाठी प्रथम क्रमांकासाठी ७१ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ६१ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी ४१ हजार रुपये अशी बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

यात्रेनिमित्त रात्री १० वाजता निलेशकुमार आहिरेकर सह रूपाली पुणेकर यांच्या लोकनाट्य तमाशाचा रंगतदार कार्यक्रम सादर होणार आहे. या सर्व कार्यक्रमांना परिसरातील भाविक आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## आंबेगावात झेंडूच्या फुलांचे मळे बहरले

### भाव कमी मिळाल्याने फुल उत्पादक शेतकरी नाराज

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव** : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात सध्या झेंडूच्या फुलांचे मळे बहरलेले दिसत असले तरी बाजारभाव अत्यंत कमी मिळत असल्याने फुल उत्पादक शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. लग्नसराई, यात्रा हंगाम आणि सणासुदीचे दिवस लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर झेंडूची लागवड केली होती; मात्र अपेक्षित भाव न मिळाल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे.



तालुक्याच्या पूर्व भागात थोरांदळे, रांजणी, वळती, नागापूर, शिंगवे, पारगाव आदी गावांमध्ये फुल उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठी आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही शेतकऱ्यांनी गोल्डन यलो, अंबरी यलो आणि कलकत्ता ऑरेंज यांसारख्या संकरित जातींच्या झेंडूची मोठ्या प्रमाणावर लागवड केली आहे. उत्पादन अधिक मिळावे यासाठी मल्चिंग पेपर आणि ठिबक सिंचनाचा वापरही मोठ्या प्रमाणावर करण्यात आला आहे.

एका एकर झेंडू पिकासाठी साधारणपणे सुमारे ७० हजार रुपये खर्च येतो. रोपे, खते, औषधे, मजुरी, मल्चिंग पेपर आणि ठिबक सिंचनाचा खर्च लक्षात घेता शेतकऱ्यांनी मोठी गुंतवणूक केली आहे. मात्र सध्या बाजारात झेंडूच्या फुलांना केवळ १० रुपये प्रतिकिलो असा दर मिळत असल्याने उत्पादन खर्चही निघत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

गेल्या सात महिन्यांपासून झेंडूच्या फुलांच्या बाजारभावात घसरण सुरूच असल्याने अनेक शेतकऱ्यांनी फुलांची तोडणीही थांबवली आहे. फुले तोडून बाजारात नेण्याचा खर्चही परवडत नसल्याचे रांजणी येथील फुल उत्पादक शेतकरी नवनाथ वाघ आणि गोरक्षनाथ वाघ यांनी सांगितले. सणासुदीचा आणि लग्नसराईचा हंगाम लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने झेंडूची लागवड केली होती. मात्र अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने फुल उत्पादक शेतकऱ्यांमध्ये मोठी नाराजी दिसून येत आहे.


## डिंभे धरण परिसरात बटाटा काढणीला सुरुवात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव** : आंबेगाव तालुक्याच्या पश्चिमेकडील आदिवासी भागात सध्या बटाटा काढणीच्या कामांना वेग आला आहे. डिंभे धरणाच्या लगत असलेल्या गावांमध्ये शेतकरी पारंपरिक पद्धतीने बैलांच्या साहाय्याने बटाटा काढणी करताना दिसत आहेत. मात्र यंदा बटाट्याच्या बाजारभावात मोठी घसरण झाल्याने शेतकरी वर्गात नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

डिंभे बुद्रुक परिसर हा प्रामुख्याने भात उत्पादनासाठी ओळखला जातो. येथील बहुतांश शेतकरी पावसाळ्यात भाताचे पीक घेतात. त्यानंतर रब्बी हंगामात बटाटा, कांदा तसेच विविध पालेभाज्यांची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. डिंभे धरणाच्या पाण्यामुळे या भागातील शेतीला मोठा आधार मिळतो.

सध्या या परिसरात बटाटा काढणीची लगबग सुरू झाली आहे. शेतकरी बैलांच्या साहाय्याने



बटाट्याची काढणी करत आहेत. त्यानंतर मजुरांच्या मदतीने बटाटे गोळा करून पोत्यांमध्ये भरले जात आहेत.

उत्पादन चांगले असले तरी बाजारात मिळणारा दर अपेक्षेपेक्षा खूपच कमी असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडत असल्याची चिंता व्यक्त होत आहे.

डिंभे बुद्रुक परिसरातील शेतकरी लक्ष्मण शिवराम डोंगरे यांच्या शेतात सध्या बटाटा काढणीचे काम सुरू आहे. यंदा बटाट्याचे उत्पादन समाधानकारक झाले असले तरी बाजारभाव घसरल्यामुळे उत्पादन खर्चही निघणे कठीण झाले आहे, असे त्यांनी सांगितले.

बियाणे, खते, औषधे आणि मजुरीचा खर्च वाढला असताना बाजारात दर कमी मिळत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

## उबेर चालकाच्या खुनाप्रकरणी आरोपीला अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर** : जुन्नर तालुक्यातील सितेवाडी गावाच्या हद्दीत गणेशखिंड घाटात उबेर चालकाचा खून केल्याप्रकरणी ओतूर पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. या कारवाईमुळे ओतूर पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे. ही घटना ५ ते ७ मार्चदरम्यान घडली होती.

नासीर अहमद सलामतुल्ला अन्सारी (वय २६, मूळ रा. शेरकोट, ता. धामपूर, जि. बिजनोर, उत्तर प्रदेश; सध्या रा. समता नगर, सेक्टर क्र. १, ऐरोली नाका, नवी मुंबई) असे खून झालेल्या उबेर चालकाचे नाव आहे. या प्रकरणी आदर्श चंद्रकांत भालेराव (वय २१, रा. संकेश्वर क्रिस्टल सोसायटी, गणेश विद्यालयाजवळ, टिटवाळा पूर्व, ता. कल्याण, जि. ठाणे) याला अटक करण्यात आली आहे.

या प्रकरणी मयताचा भाऊ मोहम्मद अमिर सलामतुल्ला अन्सारी यांनी ओतूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. ५ मार्च रोजी दुपारपासून ७ मार्चच्या सायंकाळपर्यंत सितेवाडी (ता. जुन्नर, जि. पुणे) येथील गणेशखिंड घाटात पांढऱ्या रंगाच्या एमएच-०३ डीव्ही-६४०३ या क्रमांकाच्या इर्टिगा कारमधील चालकाचा अज्ञात व्यक्तीने खून केल्याची नोंद करण्यात आली होती. त्यानुसार ८ मार्च रोजी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

तपासादरम्यान संबंधित वाहनाची माहिती उबेर कंपनीकडून मिळवली असता ५ मार्च रोजी दुपारी सुमारे ३ वाजता टिटवाळा ते जुन्नर अशी राईड आदर्श भालेराव याने बुक केल्याचे निष्पन्न झाले. तसेच वाहनाचे जीपीएस तपासले असता गाडी जुन्नरला न जाता गणेशखिंड घाट परिसरात गेल्याचे आणि नंतर पुन्हा टिटवाळ्याकडे परतल्याचे स्पष्ट झाले.

पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर त्याने गुन्ह्याची कबुली दिली. आरोपीने टिटवाळा येथून उबेर ॲपवरून इर्टिगा गाडी बुक करून चालकासोबत जुन्नरकडे प्रवास सुरू केला. माळशेज घाट मार्गे सितेवाडी हद्दीत गणेशखिंड घाटात गाडी थांबल्यानंतर दोघांमध्ये वाद झाला. झटापटीदरम्यान आरोपीने चालकाच्या हातातील चाकू हिसकावून त्याच्यावर वार करत त्याचा खून केल्याची माहिती तपासात समोर आली.

खून केल्यानंतर आरोपीने मृतदेह गाडीतून बाहेर ओढून रस्त्यालगतच्या सिमेंटच्या कठड्याखाली फेकून दिला आणि गाडी घेऊन माळशेज घाट मार्गे टिटवाळ्याकडे पळ काढला. नंतर टिटवाळा-गोवेली दरम्यान गाडी रस्त्यावर उभी करून तो फरार झाला होता. पोलिसांनी आरोपीला अटक करून न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला १२ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

ही कारवाई पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे आणि जुन्नरचे उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ओतूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक एल. जी. थाटे, पोलीस उपनिरीक्षक संदीप आमणे, पोलीस हवालदार नरेंद्र गोराणे, नामदेव बांबळे, बाळशिराम भवारी, देविदास खेडकर, भरत सूर्यवंशी आणि पोलीस कॉन्स्टेबल रोहित बोंबले यांनी पार पाडली.


### महिला वकील, पोलीस कर्मचारी आणि पक्षकारांसाठी

# जुन्नर न्यायालयात महिलांसाठी कॅन्सर पूर्व तपासणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर** : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून डिसेंट फाउंडेशन, पुणे आणि तालुका वकील संघ, जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने जुन्नर न्यायालयात महिला वकील, पोलीस कर्मचारी आणि पक्षकार महिलांसाठी 'आस्था' ब्रेस्ट कॅन्सर पूर्व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात एकूण ५७ महिलांची अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने तपासणी करण्यात आली.

शिबिरादरम्यान मार्गदर्शन करताना डॉ. प्रिया करडीले यांनी महिलांना



आरोग्याबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले. ग्रामीण भागातील महिला अनेकदा लाजपोटी किंवा आर्थिक अडचणींमुळे आजार अंगावर काढतात. स्तनाचा कर्करोग पहिल्या किंवा दुसऱ्या टप्प्यात आढळल्यास रुग्ण पूर्णपणे बरा होऊ शकतो; मात्र तिसऱ्या टप्प्यात हा आजार जीवघेणा ठरू शकतो. त्यामुळे वेळेत तपासणी करणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. शीतल शिंदे यांनी गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाबाबत माहिती देत एचपीव्ही लसीकरणाचे महत्त्व स्पष्ट केले. कुटुंबातील १४ वर्षांच्या मुलींना एचपीव्ही लस दिल्यास भविष्यातील धोके टाळता येतात. ही लस प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये विनामूल्य उपलब्ध असल्याची माहिती त्यांनी दिली.

डिसेंट फाउंडेशनच्या माध्यमातून गेल्या तीन वर्षांत ४ हजारांहून अधिक महिलांची ब्रेस्ट कॅन्सर पूर्व तपासणी करण्यात आली असून सुमारे २० गरजू रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

या कार्यक्रमाला जिल्हा सत्र न्यायाधीश एस. बी. शेलार, वरिष्ठ न्यायाधीश हुसेन साहेब, न्यायाधीश श्रेया जैन यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड. हेमंत हडवळे, डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवई, सचिव डॉ. एफ. बी. आतार, डॉ. दयानंद गायकवाड, डॉ. प्रियांका बोरा, तपासणी तज्ज्ञ सपना बेलवटे, उज्वला गवळी आदी मान्यवर उपस्थित होते.

शिबिरानिमित्त उपस्थित महिलांना आरोग्यविषयक जनजागृतीपर 'कळी उमलताना' या पुस्तकाच्या प्रतींचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. शमीन इनामदार आणि तृप्ती परदेशी यांनी केले, तर आभार वकील संघाच्या उपाध्यक्षा ॲड. नीलिमा शेरकर यांनी मानले.

## खडकवाडीत शिवजयंतीनिमित्त वकृत्व स्पर्धा संपन्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी** : आंबेगाव तालुक्यातील खडकवाडी येथे शिवजयंतीनिमित्त माजी विद्यार्थी संघटनेच्या वतीने भव्य वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात शिवजयंतीनिमित्त मिरवणुकीने झाली. यावेळी शिवव्याख्यात्या तनुजा पडवळ यांनी शिवव्याख्यान सादर केले. त्यानंतर वकृत्व स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत अंगणवाडी तसेच प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. तीनही अंगणवाडी, प्राथमिक शाळा खडकवाडी आणि माध्यमिक शाळा खडकवाडी येथील जवळपास ६५ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घेतला. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि भेटवस्तू देण्यात आल्या. प्रथम तीन क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी, प्रमाणपत्र आणि भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे : अंगणवाडी गटात प्रथम क्रमांक काव्य गुलाब धुमाळ, द्वितीय क्रमांक गार्गी मच्छिंद्र धुमाळ आणि तृतीय क्रमांक राजवर्धन शिंदे यांनी मिळविला. गट एक ते चारमध्ये प्रथम क्रमांक स्वराज आप्पासाहेब शिंदे, द्वितीय क्रमांक सोनम संपत सुक्रे आणि तृतीय क्रमांक स्वराली शेखर सुक्रे यांनी पटकावला.

## सारांश वृत्त

### बँकेच्या शाखेतून १३ लाख लुटले

**जमशेदपूर (झारखंड):** झारखंडच्या पूर्व सिंहभूम जिल्ह्यातील एका राष्ट्रीयकृत बँकेच्या शाखेतून सहा मुखवटा घातलेल्या लोकांनी १३ लाख रुपये लुटले आहेत, अशी माहिती पोलिसांनी बुधवारी दिली. मंगळवारी बहारागोडा पोलिस स्टेशन परिसरात ही घटना घडली. आरोपींनी जेवणाच्या सुट्टीत बँकेत घुसून बंदुकीचा धाक दाखवून रक्कम लुटली. तसेच कर्मचाऱ्यांचे सोन्याचे चेन, मोबाईल फोन आणि पाकिटही हिसकावून घेतले.

### दोन बांगलादेशी नागरिक ताब्यात

**नवी दिल्ली** : भारतातून परत पाठवण्यात आलेल्या दोन बांगलादेशी नागरिकांना वायव्य दिल्लीत बेकायदेशीरपणे देशात पुन्हा प्रवेश केल्याच्या आणि बेकायदेशीर कारवाया पुन्हा सुरू केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे, असे पोलिसांनी सांगितले. सोमवारी जहांगीरपुरी मेट्रो स्टेशनजवळून दिप्तो कुमार पाल (२८) आणि रुमा बेगम (२७) अशी आरोपींना अटक करण्यात आली, असे त्यांनी सांगितले. दोघांनाही गेल्या वर्षी उत्तराखंडमधून भारतात बेकायदेशीरपणे राहिल्याबद्दल हद्दपार करण्यात आले होते. तरीही, ते पुन्हा देशात प्रवेश करण्यात यशस्वी झाले आणि वैध प्रवास कागदपत्रांशिवाय दिल्लीत राहत होते.

### मध्यान्ह भोजनाने ४४ मुले आजारी

**कोइम्बतूर (तामिळनाडू)** : कवुंडमपलयम येथील एका सरकारी माध्यमिक शाळेत मध्यान्ह भोजन खाल्ल्यानंतर संशयास्पद अन्नातून विषबाधा झाल्याने ४४ मुले आजारी पडल्याची माहिती पोलिसांनी मंगळवारी दिली. महानगरपालिकेचे आयुक्त एम शिवगुरू प्रभाकरन यांनी शहरातील सरकारी रुग्णालयात उपचार घेत असलेल्या मुलांची भेट घेतली आणि ते सुरक्षित असल्याचे सांगितले. माध्यमिक शाळेत शिकणारे विद्यार्थी अन्न खाल्ल्यानंतर आजारी पडले. प्राथमिक तपासात असे दिसून आले आहे की अन्न तयार होत असताना सरडा पडला असावा, असे ते म्हणाले.

## इराणकडून इस्रायल-आखाती देशांवर क्षेपणास्त्र मारा

# पश्चिम आशियातील संघर्षाच्या तीव्रतेत वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : इराणवर अमेरिका आणि इस्रायल यांच्या हल्ल्यांनंतर सुरू झालेला पश्चिम आशियातील संघर्ष बुधवारी १२व्या दिवशी पोहोचला. तेहरानकडून इस्रायल आणि आखाती देशांवर प्रत्युत्तरात्मक हल्ल्यांची मालिका सुरू करण्यात आली असून होर्मुझची सामुद्रधुनी बंद होण्याच्या शक्यतेमुळे जागतिक तणाव वाढला आहे. या समुद्री मार्गातून जगातील सुमारे २० टक्के तेल आणि वायू व्यापार होतो.

इराणने बुधवारी इस्रायल आणि आखाती देशांवर क्षेपणास्त्र हल्ले केले. इराण रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सने दावा केला की इस्रायलमधील शहरांवर तीन तास सलग क्षेपणास्त्रांचा मारा करत "सर्वात तीव्र आणि जड" हल्ला करण्यात आला. या हल्ल्यांमध्ये सौदी अरेबियामधील तेलक्षेत्रांसह कतार, संयुक्त अरब अमिराती आणि कुवेत यांनाही लक्ष्य करण्यात आल्याचे वृत्त आहे.

दरम्यान, होर्मुझ सामुद्रधुनीजवळ एका मालवाहू जहाजाला अज्ञात प्रक्षेपणाने धडक दिल्याने त्याला आग लागली आणि कर्मचाऱ्यांना जहाज सोडावे लागले. तसेच संयुक्त अरब अमिरातीच्या किनाऱ्याजवळ आणखी एका कंटेनर जहाजालाही प्रक्षेपणाने धडक दिल्याची माहिती समोर आली आहे.

इराणचे नवे सर्वोच्च नेते मोज्तबा खामेनी जखमी झाल्याच्या अफवा पसरल्या होत्या. मात्र ते "सुरक्षित आणि निरोगी" असल्याचे इराणी राष्ट्राध्यक्षांच्या मुलाने सोशल मीडियावर स्पष्ट केले.

दुसरीकडे, तेहरानमधील निदर्शकांनी देशाच्या शत्रूंना पाठिंबा दिल्यास त्यांना शत्रू मानले जाईल, असा इशारा इराणच्या वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने दिला.

इराणच्या म्हणण्यानुसार युद्ध सुरू झाल्यापासून अमेरिका आणि इस्रायली सैन्याने देशातील सुमारे १० हजार नागरी स्थळांवर बॉम्बहल्ले केले असून १,३०० हून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला आहे. या स्फोटांमुळे राजधानी तेहरान हादरल्याचेही वृत्त आहे.

या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले की अमेरिकन सैन्याने इराणी समुद्री सुरुंग टाकणाऱ्या १० नौका नष्ट केल्या आहेत. तसेच इराणने होर्मुझ सामुद्रधुनीत अडथळे निर्माण केल्यास त्याला अभूतपूर्व लष्करी परिणामांना सामोरे जावे लागेल, असा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, लेबनॉनची राजधानी बेरूत येथे एका अपार्टमेंटवर इस्रायली हल्ला झाल्याचे राज्य माध्यमांनी म्हटले आहे. त्याच वेळी इराणने इस्रायलवर बेरूतमधील एका समुद्रकिनारी हॉटेलवर झालेल्या हल्ल्यात त्यांच्या चार राजनैतिक अधिकाऱ्यांचा मृत्यू झाल्याचा आरोप केला असून त्याला "दहशतवादी हल्ला" असे संबोधले आहे.

संघर्षाचा जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन जी-७ देशांचे नेते ऊर्जा परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी व्हिडिओ परिषद घेणार आहेत.

तसेच आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्था जागतिक बाजारातील तणाव कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात तेलसाठा बाजारात सोडण्याच्या प्रस्तावावर विचार करत आहे.

## आपल्याला बोलण्यापासून रोखले जाते : राहुल गांधी



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांना पदावरून हटवण्याच्या ठरावावरून बुधवारी लोकसभेत जोरदार वाद निर्माण झाला. या चर्चेदरम्यान विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी हस्तक्षेप करत सभागृहात आपल्याला अनेकदा बोलण्यापासून रोखले जात असल्याचा आरोप केला.

राहुल गांधी म्हणाले की, लोकसभा ही कोणत्याही एका पक्षाची नसून संपूर्ण देशाची आहे. "जेव्हा जेव्हा आम्ही बोलण्यासाठी उभे राहतो तेव्हा आम्हाला थांबवले जाते. लोकसभा ही एका पक्षाची नाही, तर देशातील प्रत्येक नागरिकाची आहे," असे त्यांनी स्पष्ट केले. त्याआधी भाजप नेते रविशंकर प्रसाद यांनी सभागृहात बोलताना सभापतींना पदावरून हटवण्याच्या प्रस्तावाचा वापर एखाद्या नेत्याच्या अहंकाराची तृप्ती करण्यासाठी करू नये, असे सांगितले. सभापतींविरोधात असा ठराव चर्चेसाठी येणे ही वेदनादायक बाब असल्याचेही त्यांनी नमूद केले.

संसदेच्या नियमांचा उल्लेख करताना प्रसाद यांनी विरोधी पक्षनेत्यांनी विशेषतः राष्ट्रीय सुरक्षेसारख्या संवेदनशील विषयांवर बोलताना शब्द काळजीपूर्वक वापरावेत आणि पक्षीय राजकारण टाळावे, असेही सांगितले. त्यांच्या या वक्तव्यावरून विरोधकांनी जोरदार गोंधळ घातला. यानंतर कार्यवाहीचे अध्यक्ष दिलीप सैकिया यांनी राहुल गांधी यांना या आरोपांना उत्तर देण्याची परवानगी दिली.

## अमेरिका म्हणते १६ इराणी नौका नष्ट

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : मध्यपूर्वेतील वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर हॉर्मुझच्या सामुद्रधुनीत तणाव अधिकच वाढला आहे. अमेरिकेने दावा केला आहे की इराण या सामुद्रधुनीत समुद्री माईन्स (जलस्फोटके) टाकण्याचा प्रयत्न करत होता आणि त्यासाठी वापरल्या जाणाऱ्या १६ इराणी नौका अमेरिकन लष्कराने नष्ट केल्या.

अमेरिकेच्या सेंट्रल कमांडच्या माहितीनुसार, या नौका हॉर्मुझ सामुद्रधुनीत खाणी टाकून जागतिक तेलवाहतूक विस्कळीत करण्याचा प्रयत्न करत होत्या. या पार्श्वभूमीवर अमेरिकन सैन्याने कारवाई करून त्या नौकांवर हल्ला केला.

हॉर्मुझची सामुद्रधुनी ही जगातील सर्वात महत्त्वाच्या ऊर्जा मार्गांपैकी एक मानली जाते. जगातील सुमारे २० टक्के तेल या समुद्री मार्गाने वाहतूक होते. त्यामुळे येथे कोणतीही लष्करी कारवाई किंवा जहाजवाहतुकीत अडथळा निर्माण झाल्यास जागतिक तेलपुरवठ्यावर मोठा परिणाम होऊ शकतो.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला इशारा देत म्हटले आहे की सामुद्रधुनीत टाकलेले कोणतेही माईन्स तात्काळ हटवले नाहीत तर कठोर लष्करी कारवाई केली जाईल. दुसरीकडे इराणनेही प्रत्युत्तर देत शत्रू देशांना तेल निर्यात होऊ देणार नसल्याचा इशारा दिला आहे.

## इच्छामरणास सर्वोच्च न्यायालयाची परवानगी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : सर्वोच्च न्यायालयाने १२ वर्षांहून अधिक काळ कोमात असलेल्या ३२ वर्षीय हरीश राणा यांना निष्क्रिय इच्छामरणाची परवानगी दिली आहे. न्यायालयाने त्यांच्या कृत्रिम जीवनरक्षक यंत्रणा काढून घेण्यास मान्यता दिली असून, देशातील निष्क्रिय इच्छामरणाच्या परवानगीचे हे पहिले प्रकरण मानले जात आहे.

२०१३ मध्ये इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून पडल्यामुळे हरीश राणा यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. त्या अपघातानंतर ते दीर्घकाळ कोमात होते.

वैद्यकीय मंडळांच्या अहवालानुसार त्यांच्या प्रकृतीत सुधारण्याची कोणतीही शक्यता नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर उपचार मागे घेण्याबाबत न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती.

न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने सुनावणी करताना नमूद केले की, वैद्यकीय मंडळांनी उपचार मागे घेण्याबाबत प्रमाणित मत दिले असल्यास साधारणतः न्यायालयाच्या हस्तक्षेपाची गरज नसते. मात्र, हा प्रकार पहिलाच असल्याने न्यायालयाकडून मार्गदर्शन आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. उपचार मागे घेण्याची प्रक्रिया मानवीय आणि सुसूत्र असली पाहिजे, असेही न्यायालयाने म्हटले.

सुनावणीदरम्यान केंद्र सरकारतर्फे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ऐश्वर्या भाटी यांनी बाजू मांडली, तर राणा यांच्या वडिलांचे प्रतिनिधित्व अधिवक्ता रश्मी नंदकुमार यांनी केले. न्यायालयाने अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था, नवी दिल्ली येथे राणांना दाखल करून आवश्यक वैद्यकीय प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

निकाल देताना न्यायालयाने भावनिक शब्दांत राणा यांच्या कुटुंबाच्या त्यागाची दखल घेतली. कठीण परिस्थितीतही कुटुंबाने राणांची निःस्वार्थपणे काळजी घेतली, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

वैद्यकीय मंडळांचे अहवाल, डॉक्टरांचे मत आणि रुग्णाच्या प्रकृतीत सुधारणा होण्याची शक्यता नसल्याचे लक्षात घेऊन न्यायालयाने उपचार मागे घेण्यास परवानगी दिली. सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी कॉमन कॉज प्रकरण (२०१८ सर्वोच्च न्यायालय निर्णय)ात दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार अशा प्रकरणांमध्ये प्राथमिक व दुय्यम वैद्यकीय मंडळांचे मत घेणे आवश्यक असल्याचेही स्पष्ट केले आहे.

## अविश्वास ठरावावरून आरोप-प्रत्यारोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पदावरून हटवण्याच्या विरोधकांच्या ठरावावरून बुधवारी लोकसभेत जोरदार राजकीय आरोप-प्रत्यारोप झाले. भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी कायदा मंत्री रविशंकर प्रसाद यांनी हा ठराव एखाद्या नेत्याच्या "अहंकाराला समाधान देण्यासाठी" वापरू नये, असे सांगत विरोधकांवर टीका केली.

ठरावावरील चर्चेत सहभागी होताना प्रसाद म्हणाले की, सभापतींना हटवण्याच्या मुद्द्यावर सभागृहात चर्चा होत आहे हेच वेदनादायक आहे. त्यांच्या मते हे पाऊल एका नेत्याच्या अहंकाराचे परिणाम आहे. विरोधकांनी अध्यक्षांच्या पॅनेलकडून सभागृह चालवता येत नाही, असा केलेला दावा त्यांनी फेटाळून लावत घटनात्मक तरतुदींचाही उल्लेख केला. संसदीय कार्यपद्धतींचा हवाला देताना प्रसाद यांनी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी विशेषतः राष्ट्रीय सुरक्षेसारख्या संवेदनशील मुद्द्यांवर बोलताना शब्द काळजीपूर्वक वापरावेत, असेही सांगितले. त्यांच्या या वक्तव्यानंतर विरोधी सदस्यांनी गोंधळ घातला. यानंतर कामकाजाचे अध्यक्ष दिलीप सैकिया यांनी राहुल गांधी यांना आरोपांना उत्तर देण्याची परवानगी दिली. यावेळी गांधी म्हणाले की, सभागृहात अनेक वेळा त्यांना बोलण्यापासून रोखले जाते. लोकसभा ही कोणत्याही एका पक्षाची नसून संपूर्ण देशाचे प्रतिनिधित्व करणारी संस्था आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

प्रसाद यांनी आरोप केला की गांधी विविध देशांच्या दौऱ्यात भारतीय संसद, संविधान आणि निवडणूक आयोगाची खिल्ली उडवत आहेत. काँग्रेसने पूर्वी अनेक निवडणुका जिंकल्या, मात्र आता त्याच संस्थांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असल्याचा दावाही त्यांनी केला.

## सर्वोच्च न्यायालय अभ्यासक्रमाचा आढावा घेणार

# वादग्रस्त प्रकरणाची दखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : एनसीईआरटीच्या आठवीच्या सामाजिक शास्त्राच्या पाठ्यपुस्तकात न्यायव्यवस्थेतील भ्रष्टाचार आणि प्रलंबित प्रकरणांवर आधारित वादग्रस्त प्रकरण समाविष्ट केल्यामुळे निर्माण झालेल्या वादाची सर्वोच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणावर सुनावणीदरम्यान केंद्र सरकारने संपूर्ण एनसीईआरटी अभ्यासक्रमाचा आढावा घेण्याचे निर्देश दिल्याची माहिती बुधवारी न्यायालयात दिली.

सुनावणीदरम्यान न्यायालयाने केंद्र, राज्ये आणि विद्यापीठांना आठवीच्या एनसीईआरटी पाठ्यपुस्तकातील वादग्रस्त प्रकरण तयार करणाऱ्या तीन तज्ज्ञांपासून दूर राहण्याचे निर्देश दिले. मात्र न्यायालयाने स्पष्ट केले की त्यांच्या आदेशांचा उद्देश न्यायव्यवस्थेवर होणाऱ्या कोणत्याही निरोगी व वस्तुनिष्ठ टीकेला आळा घालणे हा नाही. खंडपीठाने केंद्र सरकारला कायदेशीर अभ्यासक्रम अंतिम करण्यासाठी एका आठवड्यात संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञांचे पॅनेल तयार करण्याचे निर्देश दिले. केंद्राच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सांगितले की एनसीईआरटीमध्ये पद्धतशीर बदल सुरू करण्यात आले आहेत आणि विषयतज्ज्ञांकडून छाननी केल्याशिवाय कोणतीही सामग्री प्रकाशित केली जाणार नाही.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने एनसीईआरटीला थेट अभ्यासक्रमाचा आढावा घेण्यास सांगण्याऐवजी केंद्राने स्वतंत्र तज्ज्ञ समिती स्थापन करण्याचा विचार करावा, असेही मत व्यक्त केले. केंद्र सरकारने एनसीईआरटीला सर्व वर्गांच्या पाठ्यपुस्तकांचा आढावा घेण्याचे निर्देश दिल्याची माहितीही न्यायालयात देण्यात आली. या प्रकरणात एनसीईआरटीने मंगळवारी वादग्रस्त प्रकरणाबद्दल बिनशर्त माफी मागितली होती. आठवीच्या सामाजिक शास्त्राच्या 'डिस्कव्हरिंग सोसायटी: इंडिया अँड बियॉन्ड' या पुस्तकातील "आमच्या समाजात न्यायव्यवस्थेची भूमिका" या प्रकरणावरून वाद निर्माण झाला होता. या प्रकरणात न्यायव्यवस्थेतील कथित भ्रष्टाचाराचे संदर्भ असल्यामुळे तीव्र आक्षेप नोंदवले गेले होते.

एनसीईआरटीने निवेदनात म्हटले आहे की संबंधित पुस्तक पूर्णपणे मागे घेण्यात आले असून सध्या ते उपलब्ध नाही. "या प्रकरणामुळे झालेल्या गैरसोयीबद्दल आम्हाला मनापासून खेद आहे. शैक्षणिक साहित्यात अचूकता, संवेदनशीलता आणि जबाबदारीचे सर्वोच्च मानक राखण्यास एनसीईआरटी कटिबद्ध आहे," असे संस्थेने स्पष्ट केले.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच या पुस्तकावर बंदी घातली होती. मुख्य न्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाला बागची आणि न्यायमूर्ती विपुल एम. पंचोली यांच्या खंडपीठाने पुस्तकाच्या सर्व भौतिक आणि डिजिटल प्रती जप्त करण्याचे आदेश दिले होते. तसेच एनसीईआरटीचे संचालक आणि शालेय शिक्षण सचिवांना कारणे दाखवा नोटीस बजावत वादग्रस्त प्रकरणासह पुस्तक प्रकाशित केल्याबद्दल कारवाई का करू नये, अशी विचारणा केली होती.

## मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात महाभियोग?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरुद्ध महाभियोग प्रस्ताव आणण्यासाठी विरोधी पक्षांनी स्वाक्षऱ्या गोळा करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. मतदार याद्यांच्या विशेष सघन पुनरावृत्ती (एसआयआर) प्रक्रियेवरून निवडणूक आयोगावर गंभीर आरोप करत विरोधकांनी हा निर्णय घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली.

विरोधी पक्षांचे म्हणणे आहे की मतदार यादीच्या पुनरावृत्ती प्रक्रियेदरम्यान मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्या असून त्यातून "निवडणूक प्रक्रियेवर परिणाम करणारा घोटाळा" झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर मुख्य निवडणूक आयुक्तांविरुद्ध "सिद्ध गैरवर्तन" आणि निवडणूक व्यवस्थेवरील विश्वास कमी केल्याचा ठपका ठेवत त्यांना पदावरून हटवण्याची मागणी केली जात आहे.

या प्रस्तावासाठी संसदेत आवश्यक संख्याबळ मिळवण्यासाठी विरोधी पक्षांच्या खासदारांच्या स्वाक्षऱ्या गोळा केल्या जात आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, तृणमूल काँग्रेससह अनेक पक्ष या प्रक्रियेत पुढाकार घेत असून काँग्रेस आणि इतर सहयोगी पक्षांचेही समर्थन मिळत आहे.


भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२४(५) नुसार मुख्य निवडणूक आयुक्तांना पदावरून हटवण्याची प्रक्रिया सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांप्रमाणेच असते. त्यासाठी संसदेत विशेष बहुमत आवश्यक असते. प्रस्ताव मांडण्यासाठी लोकसभेत किमान १०० खासदार किंवा राज्यसभेत ५० खासदारांच्या स्वाक्षऱ्या आवश्यक असतात.

दरम्यान, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाच्या कामकाजावरून राजकीय वाद अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## विद्यार्थ्याची रॅगिंगमुळे आत्महत्या?

**सिलचर (आसाम)** : आसामच्या काचर जिल्ह्यातील एका निवासी शाळेतील नववीच्या विद्यार्थ्याचा मृतदेह त्याच्या वसतिगृहात आढळला, रॅगिंगमुळे आत्महत्या झाल्याचा संशय आहे, असे पोलिसांनी बुधवारी सांगितले. सिलचर शहराजवळील एका गावातील अरिंदम दास असे या मुलाचे नाव असून तो लखीपूर पोलिस स्टेशन परिसरातील पैलापूल येथील शाळेच्या वसतिगृहाच्या बाथरूममध्ये लटकलेल्या अवस्थेत आढळला, असे एका अधिकाऱ्याने सांगितले.

## कट्टर नक्षल्यांचे आत्मसमर्पण




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : नक्षलवादाविरोधातील कारवाईत सुरक्षा यंत्रणांना मोठे यश मिळाले असून एकूण ३.९५ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर असलेल्या १०८ कट्टर माओवाद्यांनी बुधवारी छत्तीसगडमध्ये आत्मसमर्पण केले. दंडकारण्य विशेष क्षेत्रीय समितीशी संबंधित असलेल्या या माओवाद्यांपैकी विजापूर जिल्ह्यातील ३७, दंतेवाडातील ३०, सुकमातील १८, बस्तरमधील १६, नारायणपूरमधील चार आणि कांकेरमधील तीन जणांनी सुरक्षा दलांसमोर शस्त्रे टाकली. आत्मसमर्पण केलेल्यांमध्ये सहा डिव्हिजनल कमांडरांचाही समावेश असून त्यांच्यावर प्रत्येकी आठ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर होते. आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे सुरक्षा दलांनी मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रांचा साठाही जप्त केला आहे. दरम्यान, देशातून नक्षलवाद पूर्णपणे संपवण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ३१ मार्च २०२६ ही अंतिम मुदत निश्चित केली असून त्या पार्श्वभूमीवर सुरक्षा दलांकडून नक्षलविरोधी मोहिमा अधिक तीव्र करण्यात आल्या आहेत.

## होर्मुझ सामुद्रधुनीमुळे भारतात एलपीजी संकटाची भीती

# इराण संघर्षाचा ऊर्जा पुरवठ्यावर विपरित परिणाम

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली** : इराणमध्ये सुरू असलेल्या संघर्षाचा परिणाम जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर होऊ लागला असून भारतासह अनेक देशांमध्ये तेल आणि वायूच्या उपलब्धतेबाबत चिंता वाढली आहे. सध्या देशात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा असला तरी एलपीजी पुरवठ्यावर तात्काळ परिणाम होऊ लागल्याचे संकेत मिळत आहेत. काही ठिकाणी रेस्टॉरंट्समधील गॅस स्टोव्ह बंद होण्याची वेळ येण्याची शक्यता व्यक्त केली जात असून हा मुद्दा संसदेतही उपस्थित करण्यात आला आहे.

तज्ज्ञांच्या मते, परिस्थिती गंभीर होण्याचे मुख्य कारण म्हणजे हॉर्मुझची सामुद्रधुनी. मध्यपूर्वेतील अनेक तेलवाहू जहाजे या समुद्री मार्गातून जगभर तेल व वायूची वाहतूक करतात. त्यामुळे हा मार्ग बंद राहिला किंवा युद्धामुळे वाहतुकीत अडथळे निर्माण झाले तर त्याचा थेट परिणाम भारतासारख्या ऊर्जा आयातीवर अवलंबून असलेल्या देशांवर होऊ शकतो.

डॉ. विमल कश्यप, सहाय्यक प्राध्यापक, केंद्रीय विद्यापीठ, हिमाचल प्रदेश यांनी सांगितले की भारताच्या तेल व वायू गरजांचा मोठा भाग हॉर्मुझ सामुद्रधुनीमार्गे येतो. त्यामुळे इराणमधील संघर्षाचा या मार्गावर परिणाम झाल्यास त्याचा थेट परिणाम भारताच्या ऊर्जा पुरवठ्यावर होईल. या संकटावर उपाय म्हणून त्यांनी काही पर्यायही मांडले. त्यांच्या मते, अमेरिकेने भारताला रशियाकडून तेल खरेदी करण्यासाठी सुमारे ३० दिवसांची मुभा दिली आहे. या कालावधीत भारताने आपले धोरणात्मक तेलसाठे वाढवण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसेच ब्रुनेईसारखे पर्यायी स्रोतही भारतासाठी उपयोगी ठरू शकतात. सध्या जपान आणि चीन हे ब्रुनेईकडून तेल आणि वायू खरेदी करणारे प्रमुख देश आहेत. भारतानेही अलीकडच्या काळात या दिशेने प्रयत्न वाढवले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही अलीकडेच ब्रुनेईला भेट देत ऊर्जा सहकार्याबाबत चर्चा केली होती. ब्रुनेईकडून तेल व वायू आयात केल्यास पुरवठा मलाक्का सामुद्रधुनीमार्गे होऊ शकतो, ज्यामुळे मध्यपूर्वेतील संघर्षाचा परिणाम तुलनेने कमी होऊ शकतो.

डॉ. कश्यप यांच्या मते भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा तेल व वायू ग्राहक आहे. त्यामुळे ऊर्जा गरजांसाठी केवळ काही निवडक देशांवर अवलंबून राहणे धोकादायक ठरू शकते. भविष्यातील अशा संकटांना सामोरे जाण्यासाठी ऊर्जा स्रोतांचे विविधीकरण करणे आणि पर्यायी पुरवठा मार्ग विकसित करणे अत्यंत आवश्यक आहे.